महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९३८५९००
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

**क्रमांक ३७४(२)/स्थापत्य/२०२१/१९** **दिनांक:-८ मे, २०२३**

## -: प्रसिध्दीपत्रक :-

**विषय :- महाराष्ट्र स्थापत्य अभियांत्रिकी सेवा (मुख्य) परीक्षा- २०२१, सर्वसाधारण गुणवत्ता यादीबाबत**
**संदर्भ :- पूर्व परीक्षा जाहिरात क्रमांक ०१७/२०२२, दिनांक १८ फेब्रुवारी, २०२२ व मुख्य परीक्षा अधिसूचना क्रमांक ०६४/२०२२ दिनांक १३ जुलै, २०२२.**

महाराष्ट्र स्थापत्य अभियांत्रिकी सेवा (मुख्य) परीक्षा-२०२१ या परीक्षेत अर्हताप्राप्त ठरलेल्या उमेदवारांच्या मुलाखती दिनांक १७ ते २१ एप्रिल, २०२३ आणि दिनांक २५ ते २८ एप्रिल, २०२३ या कालावधीत पुणे केंद्रावर घेण्यात आल्या होत्या. तद्अनुषंगाने संबंधित उमेदवारांची तात्पुरती सर्वसाधारण गुणवत्ता यादी आयोगाच्या संकेतस्थळावर दिनांक २८ एप्रिल, २०२३ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे.

२. प्रस्तुत परीक्षेच्या अधिसूचित संवर्ग/पदासाठी पसंतीक्रम (Preference Number) विकल्प सादर करण्याकरिता आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळावरील ONLINE FACILITES या मेनूमध्ये ‘Post Preference’ वेबलिंक उपलब्ध करून देण्यात येत आहे. सदर वेबलिंक दिनांक ९ मे, २०२३ रोजी १२.०० वाजेपासून दिनांक १५ मे, २०२३ रोजी २३.५९ वाजेपर्यंत सुरु राहील.

३. उमेदवारांकडून विहित पध्दतीने प्राप्त पसंतीक्रमाच्या आधारे अंतिम निकाल / शिफारशीसंदर्भात पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल :-

(१) वेबलिंकद्वारे उपलब्ध करून देण्यात आलेल्या ४ संवर्गाकरीता १ ते ४ मधील पसंतीक्रम अथवा No Preference’ विकल्प निवडणे अनिवार्य आहे.

(२) अधिसूचित सर्व संवर्गाकरिता/ पदांकरिता १ ते ४ मधील पसंतीक्रम निवडणा-या उमेदवारांचा त्यांनी दिलेल्या पसंतीक्रमानुसार सर्व पदांवरील निवडीकरीता विचार होईल.

(३) अधिसूचित ४ संवर्गापैकी / पदांपैकी ज्या पदांवरील निवडीकरिता इच्छुक आहे; केवळ त्याच पदाकरिता पसंतीक्रम सादर करावेत. ज्या पदांवरील निवडीकरिता इच्छुक नाही; त्या पदांकरीता ‘No Preference’ हा विकल्प निवडावा

(४) संवर्गाचे पसंतीक्रम सादर केल्यानंतर ‘Download PDF’ हा पर्याय निवडून उमेदवारास सादर केलेले पसंतीक्रम जतन करून ठेवता येऊ शकतील.

(५) पसंतीक्रम सादर करणारे उमेदवार ज्या संवर्ग / पदांकरीता पसंतीक्रम सादर करतील, केवळ त्याच संवर्ग/पदांवरील निवडीकरीता त्यांचा विचार करण्यात येईल.

(६) विहित कालावधीनंतर संवर्ग/ पदांचे पसंतीक्रम सादर करण्याची अथवा बदलण्याची उमेदवाराची विनंती कोणत्याही परिस्थितीत मान्य केली जाणार नाही.

४. विहित कालावधीत संवर्ग / पदांचे पसंतीक्रम सादर न करण्याऱ्या उमेदवारांचा कोणत्याही संवर्ग / पदावरील शिफारशीकरीता विचार करण्यात येणार नाही.

५. संवर्ग/पदांचे पसंतीक्रम सादर करण्यास कोणत्याही प्रकारच्या तांत्रिक अडचणी उद्भवल्यास आयोगाच्या १८००-१२३४-२७५ किंवा ७३०३८२१८२२ या टोल फ्री क्रमांकावर अथवा support-online@mpsc.gov.in या ई-मेल आयडीवर विहित कालावधीत संपर्क साधता येईल.

ठिकाण :- नवी मुंबई

उपसचिव (परीक्षोत्तर -राजपत्रित)
महाराष्ट्र लोकसेवा आयोग.